वर्ष - 7 । अंक - 136 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

वेळ कर बाप्पा!

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 19 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महायुतीच्या नेत्यांच्या हाती 'कमळ'च!

## » अजित पवार, शिंदे गटाला कोपरखळी : आमदार रोहीत पवार यांचे शक्तीप्रदर्शन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पलीकडे खिचडी झाली आहे. कोणाला कुठे उमेदवारी मिळेल याचा गोंधळ आहे. तिकडे उमेदवारी बाबतचा संघर्ष आतापासूनच सुरू झाला आहे असा टोला शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी महायुती सरकारला लगावला. "थोडे दिवस थांबा फक्त लोकसभा होऊ द्या, लोकसभा निवडणुकीनंतर इकडून गेलेल्या अनेक नेत्यांना कमळ चिन्हावर लढावे लागेल असे देखील रोहित पवार यावेळी म्हणाले.**



पिंपरी चिंचवड शहरात दौऱ्यानिमित्त आलेल्या आमदार रोहित पवार यांनी कासारवाडी येथे पत्रकार परिषद घेतली. पत्रकार परिषदेला शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, प्रदेश युवक कार्याध्यक्ष रविकांत वरपे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, गणेश भोंडवे, युवक शहराध्यक्ष इम्रान शेख, महिला अध्यक्ष ज्योती निंबाळकर, देवेंद्र तायडे, काशिनाथ नखाते, माधव पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी रोहित पवार म्हणाले आजही पिंपरी चिंचवड येथील नागरिक शरद पवार यांच्यासोबत आहेत. राष्ट्रवादी पक्षाचे शरद पवार हे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी पक्ष कोणाचा हा संभ्रम निर्माण व्हायचे कारण नाही. शाहू फुले आंबेडकरांच्या विचारांचा वारसा साहेबांनी चालवला तोच पुढे नेण्यासाठी आम्ही शरद पवार यांना साथ देणार आहोत.

केवळ चार लोक पलीकडे गेले म्हणून पक्ष संपला असे होत नाही. आमची विचारांची लढाई आम्ही शरद पवार यांच्या सोबतीने लढणार आहोत.

### विशेष अधिवेशन घेण्यामागचे प्रयोजन काय

» लोकसभेचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे. कदाचित भाजप डिसेंबर महिन्यामध्ये लोकसभा निवडणुका घेऊ शकते . अन्यथा सामान्य लोक अडचणीत असताना लोकसभेचे विशेष अधिवेशन घेण्यामागचे प्रयोजन काय असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला.

### म्हणून शहरातील सत्ता गेली..

**»पिंपरी-चिंचवडमध्ये पूर्वी एका नेत्याच्या पाठीमागे चार पाच लोक असायचे, हेच कोणाला नगरसेवक करायचे ते ठरवायचे, त्यांच्यामुळे शहरात पक्ष वाढला नाही. या "लोकल" नेत्यांमुळेच राष्ट्रवादी काँग्रेसची पालिकेतील सत्ता गेली. त्यामुळे तिकडे गेले ते बरे झाले.तिकडे गेलेले अनेकजण संपर्कात असून लवकरच परत येतील असेही रोहित पवार म्हणाले. पिंपरी चिंचवड शहरात शरद पवार यांना मानणारे अनेक जुने जाणते नेते आहेत. त्यामुळे या शहरात पुन्हा एकदा राष्ट्रवादीची घडी बसवण्यासाठी संघटना म्हणून खूप मोठी ताकद लावणार आहे. भाजपच्या सत्ता काळात गेल्या पाच वर्षात कोणती मोठी विकास कामे झाली आहेत. पालिकेतील ७० टक्के कामे गुजरातच्या कंपनीला दिल्याचे दिसते.**

### शहरात नियोजन नाही

**»पिंपरी चिंचवड शहरांमध्ये नियोजन नाही. अमृत योजनेमध्ये दीडशे कोटींचा खर्च करण्यात आला. नसबंदी सारख्या योजनेत कोट्यावधींचा भ्रष्टाचार झाला आहे. या योजनेच्या खर्चाच्या मुळाशी आम्ही जाणार आहोत. फुटपाथवर सातत्याने खर्च केला. एकाच कामावर सातत्याने निधी गेला आहे. कचऱ्याचे योग्य नियोजन नाही. डेंग्यूची साथ पसरली आहे. चोवीस तास पाणी देण्याचे भाजपचे आश्वासन पूर्ण झाले नाही. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत लोकांना घरे मिळाली नाहीत. महापालिका निवडणुका जाणीवपूर्वक लांबविण्यात आल्या आहेत. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा प्रलंबित ठेवून प्रशासकीय राजवट एक प्रकारे भाजपने नागरिकांवर थोपविली आहे. ज्यामुळे काही ठराविक पदाधिकाऱ्यांची कामे महापालिकेत होतात. त्यामुळे विकास खुंटला आहे.**

---

# नागरिकांनी जातीय सलोखा ठेवून गणेशोत्सव साजरा करावा : उपमुख्यमंत्री अजित पवार

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यात काही दिवसातच गणरायाचे आगमन होणार असून नागरिकांनी जातीय सलोखा ठेवून गणेशोत्सव साजरा करावा, तसेच जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.



श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गणेशोत्सव मंडळाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या शेतकऱ्यांसाठी मोफत अन्नदान कक्षाचे उद्घाटन, शारदा गजानन पुरस्कार व जिल्हा स्तरीय महिला व पुरुष कबड्डी स्पर्धा बक्षिस वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, संचालक गणेश घुले, कार्याध्यक्ष प्रसाद गव्हाणे, गणेश मंडळाचे अध्यक्ष सागर भोसले आदी उपस्थित होते. पवार म्हणाले, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गणेशोत्सव मंडळातर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार आणि शेतकरी बांधवांसाठी मोफत भोजनाचा उपक्रम चांगला आहे.

### शेतकऱ्यांसमोर बिकट संकट उभे

» राज्यातील काही भागात सध्या अवर्षणाची परिस्थिती आहे. गेल्या चार-पाच दिवसात काही ठिकाणी पाऊस झाला असला तरी तो पुरेसा नाही. शेतकऱ्यांसमोर बिकट संकट उभे राहिले असून पिकांचे नुकसान होत आहे. पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी, शेतकऱ्यांपुढील संकटावर मात करण्यासाठी शासन निधीची कमतरता पडू देणार नाही, असेही ते म्हणाले.



# सर्वांगीण प्रगतीसाठी अहंकार दूर करा!

## शिव पुराण कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांचा संदेश

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवाळीच्या निमित्ताने आपण घराची साफसफाई करतो, त्याप्रमाणे इतर सन, उत्सवाच्या वेळी करत नाही. दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजन केले जाते, जे घर सर्वात स्वच्छ असते. त्याच घरात लक्ष्मी जास्त काळ निवास करते. याप्रमाणे केवळ दिवाळीच नाही, तर इतर वेळीदेखील लक्ष्मी घरात येत असेल तर, घराप्रमाणे मनाचीही साफसफाई करावी.**

मनातील अहंकार दूर करा. लक्ष्मी कायमस्वरुपी आपल्याकडे वास्तव्य करेल, असा संदेश आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवपुराण कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी दिला. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवाराच्या वतीने नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर श्री अष्टविनायक शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप हे या कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक आहेत. गेल्या दोन दिवसांत भाजपा महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, खासदार श्रीरंग बारणे, माजी मंत्री बाळा भेगडे, राजस्थान येथील आमदार केसाराम चौधरी, माजी खासदार नानासाहेब नवले, अशोक मोहोळ, बाप्पुसाहेब भेगडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हेमंत हरहरे, विभाग कार्यवाह मुकुंदराव कुलकर्णी, प्रांत संपर्कप्रमुख मिलिंदराव देशपांडे, प्रांत मंडलसदस्य प्रकाश मिठभाकरे, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, माजी नगरसेविका झामाबाई बारणे, अश्विनी चिंचवडे, कामगार उपायुक्त अभय गीते, उद्योजक नितीन काकडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, 'पीएमआरडीए'चे आयुक्त राहुल महिवाल, महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, महावितरणचे मुख्य



अभियंता राजेंद्र पवार, शहर अभियंता मकरंद निकम, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले, पोलीस उपाधीक्षक राहुल आवारे, भाजपाच्या युवा मोर्चा सरचिटणीस तेजस्विनी कदम, कांतीलाल गुजर आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट दिली. पं. प्रदीपजी मिश्रा यांनी अतिथी कसा असावा यावर मार्गदर्शन करताना म्हाणाले की, 'अतिथी देवो भव' अशी आपली संस्कृती आता लोप पावत चालली आहे. आता येणारे अतिथी हे दोन प्रकारचे असतात.

एक जो मन पाहून येतो, दुसरा जो तुमची आर्थिक स्थिती पाहून येतो. तुमची आर्थिक स्थिती पाहून येणाऱ्यांना तुम्ही अतिथी म्हणू शकत नाही. ते केवळ स्वार्थासाठी तुमच्याशी जवळीक साधत आहेत.

### आरोग्य व शिक्षण मोफत हवे...

» शिव पुराण कथेतील सिद्धीविनायक गणेशाचा महिमा विशद करताना पं. प्रदीप मिश्रा यांनी राज्यकर्त्यांकडून अपेक्षाही केल्या. शिव पुराणामध्ये उल्लेख आहे. भगवान शंकराने मानवजातील दोन महत्त्वाच्या बाबी दिल्या. बुद्धीची देवता श्री गणेश आणि दवाई अर्थात महामृत्यूंजय मंत्र. त्यामुळे राज्यकर्त्यांना पुण्यातून केंद्रापर्यंत संदेश गेला पाहिजे की, अन्न किंवा वस्त तुम्ही मोफत देवू नका. आरोग्य सेवा व शिक्षण हे कोणत्याही राष्ट्रात मोफत असायला हवे. अनेक गरीब नागरिकांचा मृत्यू चांगल्या आरोग्य सुविधांसाठी मोठा खर्च करू न शकल्याने होतो. अनेक चांगल्या विद्यार्थ्यांना देखील क्षमता असून देखील पैशांअभावी दर्जेदार शिक्षण घेता येत नाही. त्यामुळे कोणत्याही राष्ट्रामध्ये आरोग्यसेवा व शिक्षण या दोन गोष्टीतरी किमान मोफत असाव्यात. यासाठी प्रत्येक राज्यकर्त्याने प्रयत्न करायला हवेत, असे आवाहनही पंडित प्रदीप मिश्रा यांनी केले.

# ‘रेड झोन’ हद्द निश्चिती होणार!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

### जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्यासोबत बैठक

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संरक्षण विभागाच्या देहू ॲम्युनेशन डेपो व दिघी मॅगझिन डेपो या भागातील ‘रेड झोन’ चे मार्किंग झालेले नाही. त्यामुळे रेड झोनची मोजणी करुन नकाशा प्रसिद्ध करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. यासाठी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.**



पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात ‘रेड झोन’ बाबत बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार महेश लांडगे, जिल्हाधिकारी राजेश देशमुख, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सूर्यकांत मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, नगर रचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, तहसीलदार अर्चना कदम, ‘पीएमआरडीए’ नगर रचना विभागाचे दशरथ पवार, पिंपरी-चिंचवड नगर भूमापन अधिकारी अमित ननावरे व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

संरक्षण विभागाने दिघी आणि देहू मॅगझिन डेपोच्या आवारातील ‘रेड झोन’ची हद्द निश्चित करावी. त्यासाठी सर्व्हेक्षण व मोजणी करुन नकाशा प्रसिद्ध करावा. अशी मागणी यावेळी आमदार लांडगे यांनी केली.

तसेच, निगडी, यमुनानगर, कृष्णानगर, ट्रान्सपोर्टनगर, सेक्टर २०,२१,२२,२३ व २४ परिसरातील ‘रेड झोन’ची हद्द निश्चितीबाबत अनेक वर्षांपासून प्रश्न प्रलंबित आहे. या भागातील सुमारे ७ हजार कुटुंबांना बांधकाम परवानगी, महसुली कागदपत्रे, वारस नोंदी याबाबत तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो. याबाबत जिल्हा प्रशासन, संरक्षण विभाग आणि महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली. याला जिल्हा प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेने नगर रचना विभागामार्फत ‘रेड झोन’ मोजणीबाबत प्रस्ताव नव्याने सादर करावा. महिनाभराच्या कालावधीत भूमी अभिलेख विभागाने जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने हद्द निश्चित करावी यासाठी भूमि अभिलेख आणि संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी संबंधित विभागांना दिल्या आहेत.

> जिल्हा प्रशासनाने आगामी १ महिन्यात महापालिका प्रशासनाने रेड झोन हद्द निश्चितीबाबत प्रस्ताव तयार करावा. त्याद्वारे हद्दीची मोजणी करण्यात येईल, असे आवश्वासन दिले आहे. हा प्रश्न मार्गी लागल्यास स्थानिक मिळकतधारकांना दिलासा मिळेल आणि महापालिका उत्पन्नातही वाढ होईल. त्यामुळे आम्ही सकारात्मक भूमिकेतून पाठपुरावा करीत आहोत.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

---

# आजी-आजोबा, नातवंडांमधील प्रेमाचा बंध उलगडला!

## गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आजी-आजोबा दिन उत्साहात

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकत्र कुटुंबात आजी- आजोबा यांना महत्वाचे स्थान आहे. आजी-आजोबांचे नाते अधिक वृद्धिंगत होण्यासाठी यंदापासून शाळांमध्ये आजी- आजोबा दिवस साजरा केला जात आहे. त्यातून आपल्या समाजाला एक नवी प्रेरणा मिळावी यासाठी गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आजी-आजोबा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आजी आजोबांचे औक्षण करुन पूजन करण्यात आले. शाळेतील बालवाडी विभागातील सर्व शिक्षकांनी छोटे नाटक सादर केले. त्यामधून घरातील वडिलधाऱ्यांचा कसा मान ठेवावा हा संदेश दिला.**



यावेळी खास त्यांच्यासाठी गायनाचा कार्यक्रम ठेवला होता. ज्यामध्ये सगळ्यांनी गाणे म्हटले व नृत्य सादर करुन मनमुराद आनंद लुटला. या वेळी सेल्फी पॉइंट मुख्य आकर्षण होते. चंद्राची प्रतिकृती करुन त्यामध्ये सगळ्या आजी आजोबांनी नातवंडासोबत फोटो काढले. यावेळी संस्थेचे संथापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे, बालवाडी विभागातील वृषाली आहेर, सीबीएसई विभागाच्या मुख्याध्यापिका प्राजक्ता शिंदे आदीसह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

### आजी-आजोबांचे महत्त्व विशद करण्याचा प्रयत्न...

पालक प्रत्येक वेळी आपल्या मुलांसाठी वेळ देऊ शकत नाहीत. अशा वेळी आजी-आजोब त्यांची उणीव भरून काढतात. आई-वडिलांपेक्षाही लहान मुलांना आजी आजोबा जवळचे वाटतात. ते लहान मुलांच्या जडणघडणीत खूप मोठी भूमिका बजावतात. जीवनानुभवातून अनेक गोष्टी मुलांना शिकवतात आणि नातवंडांना जीवनातील महत्त्वाचे धडे देतात. त्यामुळे त्यांचा सन्मान करण्यासाठी ग्रँड पॅरेंट्स डे साजरा केला जातो. आजी-आजोबा आणि नातवंडांमधील प्रेमाचा बंध साजरा केला जातो. या दिवशी मुले आपल्या आजी आजोबांबद्दल प्रेम व्यक्त करतात. त्यांना खुश ठेवण्याचा आणि त्यांच्या आयुष्यातील आजी आजोबांचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करतात. या उद्देशानेच हा उपक्रम घेतल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले.

# भाजपची जम्बो कार्यकारिणी जाहीर; राजू दुर्गे, सुजाता पालांडे, तुषार हिंगे यांची वर्णी

। पिंपरी ।

भाजपची पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणी रविवारी (दि.१७) जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये १ अध्यक्ष, १ वरिष्ठ उपाध्यक्ष व पक्ष प्रवक्ते, ९ उपाध्यक्ष, ६ सरचिटणीस, १० चिटणीस, १ कोषाध्यक्ष आणि ६३ कार्यकारिणी सदस्य यांच्यासह एकूण ९१ जणांचा समावेश करण्यात आला आहे. तर, विविध आघाड्या, सेल, मोर्चा यांचेही पदाधिकारी जाहीर केले आहेत. त्यामध्ये ३५ जणांना सामावून घेतले आहे. एकंदरीत, १२६ जणांना पदांचे वाटप करून पक्षनेतृत्वाने सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केला आहे. भाजपच्या शहर कार्यकारिणीची बऱ्याच दिवसांपासून प्रतीक्षा होती. भाजपमध्ये शहराध्यक्ष पदासाठी खांदेपालट झाल्यानंतर नव्या कार्यकारिणीत कोणाला संधी मिळते, नव्या-जुन्यांचा संगम साधला जाईल का, याविषयी उत्सुकता होती. ही उत्सुकता संपली आहे. मुळ कार्यकारिणीत ९१ जणांना संधी देऊन जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना सामावण्याचा प्रयत्न केला आहे.

**कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:**

शहराध्यक्ष शंकर जगताप, वरिष्ठ उपाध्यक्ष व पक्ष प्रवक्ते : राजू दुर्गे. उपाध्यक्ष माऊली थोरात, रवींद्र देशपांडे, विनोद मालू, विशाल कलाटे, सिद्धेश्वर बारणे, बिभीषण चौधरी, पोपट हजारे, बाळासाहेब भुंबे, आशा काळे. सरचिटणीस : संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शैला मोळक, शीतल शिंदे, नामदेव ढाके, विलास मडिगेरी. चिटणीस : मधुकर बच्चे, राजश्री जायभाय, गीता महेंद्र, विजय शिनकर, सागर फुगे, कविता भोंगळे, हिरेन सोनवणे, देवदत्त लांडे, विशाल वाळुंजकर, महेंद्र बाविस्कर, कोषाध्यक्ष : संतोष निंबाळकर.




# अस्मानी आणि सुल्तानी आपत्ती !

**मोरोक्को आणि लिबिया या उत्तर आफ्रिकी अरब देशांमध्ये गेल्या काही दिवसांत आलेल्या नैसर्गिक आपत्तींनी घडवलेले थैमान अभूतपूर्व आहे. दोन्ही आपत्तींमध्ये मृतांचा आकडा पहिल्या दोन दिवसांतच वाढलेला दिसून आला. यातून जशी आपत्तींची तीव्रता दिसते, तितकाच आपत्ती प्रतिसाद आणि निवारणाचा अभावही प्रतिबिंबित होतो.**

मोरोक्को आणि लिबिया या देशांमध्ये सध्या वेगवेगळ्या प्रकारच्या राजवटी आहेत. मोरोक्कोमध्ये तुलनेने स्थिर परंतु सुस्तावलेली घटनात्मक राजेशाही आहे. तर लिबिया हा अधिक अस्थिर आणि दुभंगलेला आहे. याच्या पश्चिम आणि पूर्व भागावर वेगवेगळ्या राजवटींची सत्ता आहे. पण दोन्ही राजवटींमध्ये लोकशाहीचा लवलेश नाही. त्यामुळे कर्नल मुहाम्मर गडाफी यांच्या २०११मधील उच्चाटन व हत्येनंतर या देशात केंद्रीभूत सरकार नावाची व्यवस्थाच अस्तित्वात नाही. मोरोक्कोतील भूकंपाची रिश्टर तीव्रता ६.८ इतकी होती. लिबियात जवळपास १०० सेंटिमीटर पाऊस एका दिवसात कोसळला. जगात इतरत्र यापेक्षा अधिक तीव्रतेचे भूकंप आणि अधिक पाऊस उद्भवत असतात.



परंतु नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्याच्या पद्धतीमध्ये आजही प्रगत आणि अर्धप्रगत किंवा आर्थिक मागास देशांच्या बाबतीत तफावत दिसून येतेच. भूकंपवगळता इतर नैसर्गिक उत्पात म्हणजे उदा. अतिवृष्टी, उष्णलहरी, वणवे यांच्या भाकितांविषयीचे तंत्रज्ञान प्रगत देशांमध्ये अत्याधुनिक बनल्यामुळे तेथे जीवित व वित्तहानी तुलनेने कमी होते. या देशांमध्ये प्रतिसाद आणि निवारण यंत्रणाही सुसज्ज असते. या तुलनेत बहुतेक आशियाई आणि आफ्रिकी देशांमध्ये या आघाडय़ांवर प्रचंड उदासीनता आणि निष्काळजीपणा दिसून येतो. त्यामुळे अपरिमित जीवित व वित्तहानी होते. मोरोक्को आणि लिबिया या दोन्ही देशांना या आघातांतून सावरण्यासाठी बराच अवधी लागेल. मोरोक्कोत झालेला भूकंप गेल्या जवळपास १०० वर्षांतला त्या देशातील सर्वाधिक शक्तिशाली आणि विनाशकारी ठरला. या भूकंपाचे केंद्र मराकश या मोठय़ा शहराच्या नैर्ऋत्येला अटलास पर्वताच्या खाली होते. या भागात भूकंपांचे लहान-मोठे धक्के बसत असल्याचे २००७ मध्ये आढळून आले होते. त्यामुळे भूकंप अचानक आला, तरी अकल्पित नव्हता. पर्वतीय ग्रामीण भागाला मोठा धक्का बसला. अशा ठिकाणी शहरांप्रमाणे घरांची रचना पुरेशी भूकंपरोधक नसते. त्यामुळे साध्या संरचनेची दगड-विटांची घरे पत्त्यांसारखी कोसळली आणि विखुरली. भूगर्भातील या प्रलयकारी हालचालीनंतर तिकडे लिबियाच्या पूर्व भागात आकाश कोसळले. तो प्रकोप 'डॅनियल' वादळामुळे घडून आला. डेर्ना या बंदर शहरामध्ये दोन धरणांचे पाणी घुसले. हे शहर एका खोऱ्याच्या टोकाला वसले आहे. धरण परिसरात डॅनियल वादळाने खोऱ्याच्या दुसऱ्या बाजूस असलेल्या धरण क्षेत्रात अभूतपूर्व पाऊस 'ओतला'. तो जलभार सोसण्याची क्षमताच नसलेली जुनाट धरणे फुटली आणि ते पाणी डेर्ना शहरात पसरले. या शहराची लोकसंख्या जवळपास १ लाख असून, मृतांचा अधिकृत आकडा ५३०० रविवार उजाडेपर्यंत असला, तरी दहा हजारांहून अधिक बेपत्ता आहेत. ते जिवंत असण्याची आशा संपुष्टात आली आहे. मोरोक्कोमध्ये मृतांचा आकडा तीन हजारांवर पोहोचला असला, तरी प्रत्यक्षात त्यापेक्षा अधिक जणांनी जीव गमावला असण्याची शक्यता आहे. संकटातून उभे राहण्यासाठी यांना प्राधान्याने पाश्चिमात्य देश आणि संस्थांवर अवलंबून राहावे लागेल. पण यासाठी मदत स्वीकारण्याची यंत्रणा असावी लागेल. मोरोक्कोने आतापर्यंत केवळ संयुक्त अरब अमिराती, कतार, ब्रिटन आणि स्पेनकडून मदत स्वीकारली. फ्रान्सकडून सरकारी व स्वयंसेवी संस्थात्मक मदत त्यांनी नाकारली आणि याबद्दल कोणतेही कारण दिले नाही. मोरोक्कोचे राजेही सुरुवातीला भूकंपस्थळी फिरकले नव्हते. तेथील पर्वतीय भागांमध्ये राहणाऱ्या अनेक नागरिकांवर 'सरकार अस्तित्वात आहे का', असा संतप्त सवाल यंत्रणेला विचारण्याची वेळ आली. मोरोक्कोचे लष्कर सध्या मदत व पुनर्वसन कार्यात गुंतलेले असले, तरी ते पुरेसे परिणामकारक ठरलेले नाही. लिबियामध्ये तर वेगळीच कहाणी. परदेशी मदतपथकांना लिबियात येण्यासाठी कधी व्हिसा मंजूर होतो तर कधी नाही. कारण दोन भिन्न राजवटी तेथे कार्यरत आहेत. मोरोक्को हा पर्यटन आणि औद्योगिकीकरणामुळे आर्थिकदृष्टय़ा बऱ्यापैकी स्थिरावलेला देश. लिबिया हा अस्थिर व दुभंगलेला असला, तरी तेल उत्पादक आणि निर्यातदार असल्यामुळे काही प्रमाणात निधी या देशाकडेही उपलब्ध आहे.

## संपादकीय »

# दुभंगता विकास!

***केवळ रोषणाई म्हणजे शहर सौंदर्यीकरण, घोषणा म्हणजेच वास्तव आणि अस्मितावाद म्हणजेच राजकारण- अशा अवस्थेत नगर व्यवस्थांची उसवती वीण लक्षातही घेण्यास कोणी तयार नाही..***

गेले दोन दिवस 'लोकसत्ता'ने गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाऊ इच्छिणाऱ्यांची ससेहोलपट चव्हाटय़ावर मांडली. तासाला १२०० इतक्या प्रचंड गतीने दुथडी भरून वाहणाऱ्या बसगाडय़ा, रेल्वेच्या बेफिकिरीने स्थानकांस आलेले निर्वासित छावण्यांचे स्वरूप, सागरी मार्ग उपलब्ध नाही आणि विमानांची सोय नाही.

कोठेही न जाता शहरांत राहू इच्छिणाऱ्यांच्या हालअपेष्टा तर कुत्राही खाण्यास तयार नाही, खड्डेयुक्त मार्गांनी शहरांतर्गत वाहतुकीची पार उडालेली दैना, 'मेट्रो'च्या स्वप्नांचे मृगजळ आणि देशातील सगळय़ात गर्दीची 'मेट्रो' मार्गिकाही नुकसानीत निघालेली, (रविवारच्या अंकात गावोगावच्या मेट्रोचे गंभीर आर्थिक वास्तव पाहावयास मिळते), त्यात एखादा सण आला तर पोटात गोळा यावा अशी नागरी स्थिती.

**दक्षिण काश्मिरमधील अनंतनागच्या जंगलात पाकिस्तान- पुरस्कृत दहशतवाद्यांच्या विरोधात १३ सप्टेंबर रोजी कारवाई करताना १९ राष्ट्रीय रायफल बटालियनचे (आरआर) कमांडिंग ऑफिसर, कर्नल मनप्रीत सिंग, मेजर आशिष धौनक आणि माजी काश्मिर डीजपी मुलगा, डेप्युटी सुप्रीटेंडेंट ऑफ पोलीस हुमायून बट्ट यांना वीरमरण आले. १९ आरआर, काश्मिर पोलीस आणि भारतासाठी हा दुर्दैवी दिवस होता.**

# चकमकीनंतरही सैनिकांची व्यथा कायमच ?

आपल्या पासिंग आउट परेडच्या वेळी सर्व कॅडेट्स आणि रिक्रूट्स, संविधानाच्या रक्षणासाठी प्राण निछावर करण्याची आणि जीव धोक्यात घालूनही, आदेश मिळेल तेथे, जमीन, समुद्र किंवा आकाश मार्गे जाऊ, अशी शपथ घेतात. सर्व अधिकारी आणि सैनिक या शपथेचे शब्दशः पालन करतात. इट इज 'नेशन फर्स्ट, ऑलवेज अँड एव्हरी टाईम ' हे शब्द या कारवाईतही खरे ठरले. कोकरनागच्या गरोल एरियातील निबिड, घनदाट जंगलातील पहाडांमधे अत्याधुनिक शस्त्रांसहित लपलेल्या दहशतवाद्यांना हुडकून ठार करणं हा पोरखेळ नाही. १९ आरआर बटालियनचे कमांडिंग ऑफिसर, कर्नल मनप्रीत सिंग यांनी या एन्काऊंटरमधे अग्रणी भूमिका, ज्याला आर्मीत 'लीडिंग फ्रॉम फ्रंट' म्हटले जाते, तशी निभावली होती. कर्नल सिंग आणि त्यांचा कंपनी कमांडर, मेजर आशिष धौनक हे दोघेही, गॅलंटरी सेना मेडल या शौर्य पुरस्कारानी या आधीच्या कारवायांसाठी विभूषित



झाले होते. कदाचित या कारवाईसाठी आताही त्यांना वीरता पुरस्कार मिळेल... पण तो धारण करण्यासाठी त्यांची छाती मात्र नसेल. जेव्हा जेव्हा त्यांच्या वीरपत्नी आणि त्यांची मुले ते वीरता पुरस्कार पहातील त्या वेळी त्यांची मने दुःखाने गदगदतील. पण त्यांचे अश्रू पुसण्यासाठी कोणीही नसेल. नेहमी प्रमाणे चित्रवाणी वृत्तवाहिन्यांनी आपल्या टीआरपी वृद्धीसाठी या एन्काउंटरचाही वापर केला अजूनही करताहेत. सामान्य माणसाच्या कथा, व्यथांना कव्हर करण्यात या वृत्तवाहिन्यांना तिळमात्र इंटरेस्ट नसतो. हुतात्मा सैनिकांच्या घरी आणि/किंवा त्यांच्या अंतसंस्काराच्या वेळी त्यांच्या कुटुंबीयांच्या तोंडासमोर माईक घुसडून/ धरून ज्या प्रकारे, असंबद्ध, अतार्किक आणि रुचिहीन प्रश्न विचारतात ते असहनीय असते. कुटुंबीयांना त्यांचे दुःख उदात्तरीत्या (डिग्निफाईड वे) सहन करू देण्याऐवजी या वाहिन्या त्याचा तमाशा मांडतात. या एन्काउंटरचे आपापल्या परीनी वर्णन करणारे विविध व्हिडिओज, इंटरनेटवर मिनिटा गणिक प्रसृत झाले आणि अजूनही होताहेत.

यात हौशे- गवशे सारे सामील आहेत. चित्रवाणी वाहिन्यांच्या चर्वितचर्वणासाठी राजकारण आणि नेते हे नेहमीचे खाद्य असताना त्या या हुतात्म्यांच्या आणि सेनेच्या मोहिमांमागे का लागतात हे अनाकलनीय आहे. जर त्यांना सैनिकांची एवढी काळजी असेल तर त्यांनी निवृत्त सैनिकांच्या प्रश्नांना वाचा फोडावी. पण दिल्लीतील जंतरमंतरवर निवृत्त सैनिकांवर (११ ऑगस्ट २०१५ रोजी) लाठीमार झाला होता तेव्हा एकही प्रसारमाध्यम प्रतिनिधी किंवा व्हिडिओमेकर तेथे दिसला नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय टाळणे चुकीचे!

## » सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना दिले निर्देश

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या ठाकरे व शिंदे गटाशी संबंधित वादासंबंधी दाखल 2 याचिकांवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यात शिवसेना पक्ष व चिन्हाबाबतची सुनावणी 3 आठवडे पुढे ढकण्यात आली आहे. तर 16 आमदारांच्या अपात्रतेसंबंधीची सुनावणी 2 आठवड्यांपर्यंत लांबणीवर टाकण्यात आली आहे.**

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. न्यायमूर्ती बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठापुढे ही सुनावणी झाली. यावेळी CJI डीवाय चंद्रचूड यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना खडेबोल यांच्यावर नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय वाजवी वेळेत घेण्याचे निर्देश दिले होते. प्रस्तुत न्यायालय विधानसभा अध्यक्षांचा आदर करते. पण सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रतिष्ठा राखली जावी अशी आमचीही अपेक्षा आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनी एका आठवड्याच्या आत या प्रकरणाची सुनावणी करून पुढील सुनावणीत आपले कामकाज किती पुढे सरकले हे स्पष्ट करावे, असे कोर्टाने या प्रकरणी अध्यक्षांना सांगितले आहे. हे प्रकरण अनिश्चित काळापर्यंत चालू शकत नाही,



असे नमूद करत सरन्यायाधीशांनी यावेळी विधानसभा अध्यक्षांना आपल्या कामकाजाचे वेळापत्रक कळवण्याचेही निर्देश दिलेत. शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी जून 2022 मध्ये पक्षाविरोधात बंडखोरी केली होती. यानंतर शिंदे यांनी भाजपसोबत राज्यात सरकार स्थापन केले आणि ते स्वतः मुख्यमंत्री झाले. यानंतर शिंदे यांनी शिवसेनेवर दावा ठोकला. 16 फेब्रुवारी 2023 रोजी निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला खरी शिवसेना म्हणून स्वीकारले. तसेच शिंदे गटाला शिवसेनेचे नाव आणि चिन्ह (धनुष्यबाण) वापरण्यास परवानगी देण्यात आली. निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. एकनाथ शिंदे गटाच्या 16 बंडखोर आमदारांच्या अपात्रतेवर सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांपूर्वी निर्णय दिला होता. त्यात न्यायालयाने बंडखोर आमदारांच्या सदस्यत्वाचा निर्णय सभापतींवर सोपवला होता. त्याचवेळी उद्धव ठाकरे गटाचे नेते सुनील प्रभू यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून या प्रकरणाचा फेरविचार करण्याचे आवाहन केले होते. महाराष्ट्रात शिवसेना शिंदे गट आणि उद्धव गटाने एकमेकांच्या आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी दाखल केलेल्या याचिकांवर 14 सप्टेंबर रोजी सुनावणी झाली. विधानसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही सुनावणी घेतली. यानंतर शिंदे गटाचे वकील अनिल साखरे यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, उद्धव गटाकडून आम्हाला कागदपत्रे मिळालेली नाहीत. याला उत्तर देताना ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर म्हणाले की, हा शिंदे गटाच्या रणनीतीचा भाग आहे. दोन्ही गटांना खटल्याशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देणे हे विधानसभा अध्यक्षांचे काम आहे.

### 54 आमदारांना पाठवली होती नोटीस

» शिवसेनेच्या ठाकरे व शिंदे गटाशी संबंधित वादासंबंधी दाखल 2 याचिकांवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेच्या दोन्ही गटातील 54 आमदारांना या प्रकरणी सुनावणीसाठी नोटीस पाठवली होती. ज्यामध्ये सर्व आमदारांना विधानभवनात हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. यावेळी दोन्ही गटांचे आमदार आणि त्यांचे वकील उपस्थित होते. सध्या या प्रकरणाची सुनावणी पुढील आठवड्यापर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

# 'हर घर नल', पण स्वखर्चाने?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

हिंगोली शहरापासून काही अंतरावर असलेल्या पिंपळखुटा येथे 90 लाखांची नळ योजनेचे काम हाती घेतले, मात्र कंत्राटदाराच्या मनमानीमुळे अद्यापही काम पूर्ण झालेच नाही. त्यामुळे गावकऱ्यांना विकतच्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे. या नळ योजनेच्या कामाची चौकशी करून कामबंद ठेवणाऱ्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. पिंपळखुटा येथे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत नळ पाणी पुरवठा योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. सुमारे 90 लाख रुपये खर्चाच्या या योजनेचे काम मागील पाच महिन्यापासून सुरु झाले आहे. मात्र काम सुरु झाल्यानंतर कंत्राटदाराने गावात अंथरलेल्या जलवाहिन्यात अगदीच एक ते दिड फुटावरच आहे. त्यामुळे खोदकाम झालेल्या ठिकाणी नव्याने रस्ता केल्यास जलवाहिन्या फुटण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे. या शिवाय विहीरीचे काम पूर्ण केले असले तरी त्यावरून गावकऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात पाणी पुरवठा केला जात नाही. त्यामुळे गावकऱ्यांना विकतच्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे. वर्षाकाठी 5 हजार रुपये पिण्याच्या पाण्यासाठी मोजावे लागत असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, गावात मागील तीन महिन्यापासून नळ योजनेचे काम बंद आहे. गावात झालेली कामे देखील निकृष्ठ दर्जाची असून पाणी पुरवठा विभागाने या कामांची चौकशी करून दोषी कंत्राटदारावर कारवाई करावी तसेच त्यांना काळ्यायादीत टाकून नवीन कंत्राटदारामार्फत किंवा प्रशासनानेच काम हाती घेऊन योजना तातडीने पूर्ण करावी अशी मागणी गावकरी मनेश खंदारे, संतोष पाखरे, विठ्ठल थोरात, रामू पाखरे, संदीप खंदारे, पवन खंदारे यांनी केली आहे.

# आजकाल तृतीयपंथीयही आमदार!

## » प्रहारचे आमदार बच्चू कडू यांची जीभ घसरली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बोलण्यात दम नसतो, ज्याच्या ओठावर मिशी नसते, चालतो तेव्हा बाई आहे की, माणूस ते पण कळत नाही, असे लोकही आजकाल आमदार होतात. तृतीयपंथीयही आमदार होतात असे वादग्रस्त वक्तव्य प्रहार पक्षाचे आमदार बच्चू कडू यांनी केले आहे. वास्तविक आपली चूक लक्षात आल्यावर बच्चू कडू यांनी लगेचच माफी देखील मागितली आहे. आंडू-पांडू लोक आमदार होतात असे मला म्हणायचे होते. पण मी चुकीचा शब्द बोलून गेलो त्याबद्दल माफी मागतो, असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.**



### काँग्रेसच्या रॅलीवर टीका

» जळगावातील सावदा इथे काँग्रेसच्या रॅलीत एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाला होता. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत ही रॅली काढण्यात आली होती. या घटनेचाही बच्चू कडू यांनी कडक शब्दात समाचार घेतला. कॉलेज आणि शाळांमधील मुलांचा वापर पक्षाच्या कामासाठी होता कामा नये. एखादी संस्था असे करत असेल तर अशा संस्था बंद केल्या पाहिजेत, अशी मागणी देखील आमदार बच्चू कडू यांनी केली. संबंधितांवर कारवाईची मागणी देखील बच्चू कडू यांनी केली आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांची सभेत बोलताना जीभ घसरली होती. मात्र, त्यांना या बद्दल प्रश्न विचारण्यात आल्यावर लगेचच त्यांनी वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. तसेच या चूकीबद्दल माफीही मागितली. तसेच आपल्याला तसे म्हणायचे नव्हते. पण आपण बोलण्याच्या ओघात तसे बोलून गेलो असल्याचे आमदार बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

आमदार बच्चू कडू यांच्या संभेचे आयोजन जळगाव जिल्ह्यात करण्यात आले होते. त्या वेळी आमदार बच्चू कडू यांनी हे वादग्रस्त वक्तव्य केले आहे. बच्चू कडू म्हणाले की, मी आमदार होणार की नाही? याची मला पर्वा नाही. मात्र शेतकऱ्यांची पर्वा असणारा आमचा पक्ष आहे. वास्तविक आज काल तृतीयपंथीयही आमदार होतात असे वक्तव्य त्यांनी केले. जळगावातल्या शेतकरी संवाद मेळाव्यात हे वक्तव्य त्यांनी रविवारी केलं.

कॉलेज आणि शाळांमधील मुलांचा वापर पक्षाच्या कामासाठी होता कामा नये. एखादी संस्था असे करत असेल तर अशा संस्था बंद केल्या पाहिजेत, अशी मागणी देखील आमदार बच्चू कडू यांनी केली.

याबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी आता माफी मागितली आहे. या संदर्भात बोलताना आमदार बच्चू कडू म्हणाले की, शेतकरी मेळाव्यातल्या भाषणात आपण जे बोललो ते चुकीचे होते. आंडू-पांडू लोक आमदार होतात असे मला म्हणायचे होते. मी चुकीचा शब्द बोलून गेलो त्याबद्दल माफी मागतो.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा संसदेत इव्हेंट!

## » पंतप्रधान संसदेत कमीवेळा येतात: मल्लिकार्जुन खरगे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आजपासून संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. या अधिवेशनात काय निर्णय घेतले जाणार याकडे देशाचं लक्ष लागलं आहे. आज सकाळीच पत्रकारांशी संवाद साधत असताना अधिवेशनात ऐतिहासिक निर्णय घेतले जातील असे संकेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिले आहेत. या अधिवेशनात नेमके कुठले निर्णय घेतले जातील हे अद्याप समोर आलेलं नाही.**

अशात विरोधकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी संसदेत कमीवेळा येतात आणि जेव्हा येतात तेव्हा त्याचा इव्हेंट करतात. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीबाबत हे वक्तव्य केलं आहे की, “भारताचे पंतप्रधान जेव्हा पंडित नेहरु होते, त्यावेळी ते म्हणायचे की जर तुमचे विरोधक हे प्रबळ नसतील तर तुमच्या सिस्टिममध्ये काहीतरी कमतरता राहिल्या आहेत. सध्याची अवस्था अशी नाही. विरोधी पक्ष मजबूत स्थितीत आहे. ईडी, सीबीआयच्या माध्यमातून विरोधकांना कमकुवत केलं जातं आहे. आरोप करायचे, त्रास द्यायचा, मग त्यांना आपल्या पक्षात घ्यायचं, वॉशिंग मशीनमध्ये टाकायचं आणि मग पक्षात स्वागत करायचं. हेच चाललं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संसदेत खूप कमीवेळा येतात आणि जेव्हा येतात तेव्हा त्याचा इव्हेंट करतात.” असं म्हणत मल्लिकार्जुन खरगेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. मल्लिकार्जुन खरगे यांनी आपल्या भाषणात मणिपूरचा मुद्दाही उपस्थित केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सगळ्या ठिकाणी जात आहेत, भेटी देत आहेत मात्र मणिपूरला जायला त्यांना वेळ नाही. आम्हाला संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या शेवटच्या सत्रात चर्चा हवी आहे. त्यावर उपसभापतींनी संमती दिली नाही. ज्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींवर खरगेंनी टीका केली. अटलबिहारी वाजपेयी हे जेव्हा देशाचे पंतप्रधान होते तेव्हा त्यांनी त्यांच्या कार्यकाळात २१ वेळा त्यांनी परंपरेवर भाष्य केलं. तर मनमोहन सिंग यांनी ३० वेळा संसदेच्या परंपरेवर भाष्य केलं. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फक्त दोनदा भाष्य केलं ही खरंच लोकशाही आहे का? असाही प्रश्न खरगेंनी विचारला.



### खरगेंनी मांडला मणिपूरचा मुद्दा

» राज्यसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीबाबत हे वक्तव्य केलं आहे की, “भारताचे पंतप्रधान जेव्हा पंडित नेहरु होते, त्यावेळी ते म्हणायचे की जर तुमचे विरोधक हे प्रबळ नसतील तर तुमच्या सिस्टिममध्ये काहीतरी कमतरता राहिल्या आहेत. सध्याची अवस्था अशी नाही. विरोधी पक्ष मजबूत स्थितीत आहे. ईडी, सीबीआयच्या माध्यमातून विरोधकांना कमकुवत केलं जातं आहे. आरोप करायचे, त्रास द्यायचा, मग त्यांना आपल्या पक्षात घ्यायचं, वॉशिंग मशीनमध्ये टाकायचं आणि मग पक्षात स्वागत करायचं. हेच चाललं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संसदेत खूप कमीवेळा येतात आणि जेव्हा येतात तेव्हा त्याचा इव्हेंट करतात.” असं म्हणत मल्लिकार्जुन खरगेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे.

# वृत्तवाहिन्यांची यंत्रणा कठोर असावी!

## » एनबीडीएला सुप्रीम नवी मार्गदर्शक तत्त्वे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वृत्तवाहिन्यांवर लक्ष ठेवणारी स्वयं-नियामक यंत्रणा आम्हाला कडक करायची आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी, 18 सप्टेंबर रोजी सांगितले. न्यायालयाने न्यूज ब्रॉडकास्टर्स अँड डिजिटल असोसिएशन (NBDA) ला नवीन मार्गदर्शक तत्त्वे आणण्यासाठी आणखी 4 आठवड्यांची मुदत दिली आहे. वास्तविक, NBDA ने सांगितले की नवीन मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी आम्ही आमचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती (निवृत्त) एके सिकरी आणि माजी अध्यक्ष आरव्ही रवींद्रन यांच्याशी चर्चा करत आहोत.**

त्यावर उत्तर देताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी परडीवाल आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने या गोष्टी सांगितल्या. सुनावणीदरम्यान एनबीडीएच्या वतीने ज्येष्ठ वकील अरविंद दातार न्यायालयात हजर झाले. नवीन मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी त्यांनी चार आठवड्यांचा वेळ मागितला. केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता हजर झाले. ते म्हणाले की, केंद्र सरकारने आधीच त्रिस्तरीय प्रणाली तयार केली आहे, ज्यामध्ये पहिले पाऊल म्हणजे स्वयं-नियमन आहे. NBFI ला देखील त्यांचे स्वतःचे नियम फाइल करण्याची परवानगी द्यावी. CJI म्हणाले की आम्हाला स्वयं-नियमन यंत्रणा कडक करायची आहे. या संदर्भात दिलेल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. तथापि, तुम्ही (NBDA आणि NBFI) मतातील मतभेद दूर करू शकत नाही. या प्रकरणावर चार आठवड्यांनंतर सुनावणी होणार आहे. तत्पूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने वृत्तवाहिन्यांवर देखरेख ठेवण्यासाठी अस्तित्वात असलेल्या स्वयं-नियामक यंत्रणेमध्ये दोष आढळला होता. न्यायालयाने या मुद्द्यावर केंद्र सरकारकडून उत्तर मागवले होते आणि आम्हाला ते अधिक प्रभावी करायचे आहे, असे म्हटले होते. एनबीडीएने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. एनबीडीएच्या वैधानिक रचनेत पारदर्शकता नसल्याचे उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले होते. वृत्तवाहिन्यांची स्वयं-नियामक यंत्रणा प्रभावी करणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने म्हटले होते. लोकांच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवली तर तो गुन्हा आहे. अशा स्थितीत वृत्तवाहिन्यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावणे पुरेसे नाही. गेल्या 15 वर्षांपासून या दंडाच्या रकमेत वाढ करण्याचा कोणताही विचार झालेला नाही.



### द्वेष थांबवण्याची जबाबदारी अँकरची

» सप्टेंबर 2022 मध्ये, सुप्रीम कोर्टाने टीव्ही चॅनेलला द्वेषपूर्ण भाषण आणि टॉक शो प्रसारित केल्याबद्दल कडक फटकारले होते. द्वेषयुक्त भाषणाशी संबंधित याचिकांवर सुनावणी करताना न्यायमूर्ती केएम जोसेफ आणि न्यायमूर्ती हृषिकेश रॉय यांच्या खंडपीठाने सांगितले की, एखाद्याला द्वेषयुक्त भाषा बोलण्यापासून रोखणे ही अँकरची जबाबदारी आहे. या प्रकरणी सरकार मूक प्रेक्षक का राहते, हा किरकोळ मुद्दा आहे का, असा सवाल खंडपीठाने केला.

# पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीनंतर जागावाटप?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

या वर्षी होणाऱ्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांनंतर इंडिया आघाडीच्या भागीदारांसोबत जागा वाटपावर चर्चा झाली पाहिजे. हैदराबादमध्ये 16-17 सप्टेंबर रोजी झालेल्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या (CWC) बैठकीत काही काँग्रेस नेत्यांनी पक्षाच्या हायकमांडकडे ही मागणी केली आहे.

वृत्तसंस्था पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, ही मागणी करणारे बहुतेक नेते त्या राज्यांतील आहेत जिथे काँग्रेसची इंडिया आघाडीच्या इतर पक्षांशी थेट स्पर्धा आहे. या नेत्यांना विश्वास आहे की 5 राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत पक्ष चांगली कामगिरी करेल, त्यामुळे जागावाटपाच्या वेळी ते मजबूत स्थितीत असतील. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराममध्ये या वर्षाच्या अखेरीस निवडणुका होणार आहेत.

निवडणूक आयोगाने अद्याप तारखा जाहीर केल्या नसल्या तरी पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्या जाहीर होण्याची शक्यता आहे. माजी केंद्रीय मंत्री अजय माकन, प्रवक्त्या अलका लांबा आणि प्रताप सिंग बाजवा यांच्यासह दिल्ली आणि पंजाबमधील काही नेत्यांनी आम आदमी पक्षाच्या (आप) वर्तनावर नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, 'आप'चे नेते पक्षावर हल्ला करून पक्षश्रेष्ठींचे नुकसान करत आहेत. अजय माकन म्हणाले की, आम आदमी पार्टी ज्या राज्यांमध्ये काँग्रेस सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत आहे तेथे निवडणूक लढवण्याची घोषणा करत आहे. तिकडे 'आप' काँग्रेस नेत्यांवर हल्लाबोल करत आहे. ते थांबवावे, अशी मागणी त्यांनी केली.

पंजाब काँग्रेसचे अध्यक्ष अमरिंदर सिंग राजा वाडिंग म्हणाले की पंजाबमध्ये आप सोबत युती करण्याच्या बाजूने नाही कारण त्यांच्या नेत्यांना तिथे लक्ष्य केले जात आहे. या विषयावर स्वतंत्रपणे चर्चा केली जाईल, असे पक्षाच्या हायकमांडने सांगितले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आश्वासन दिले की इतर पक्षांसोबत जागावाटपावर राज्य घटकांच्या सल्ल्यानेच चर्चा केली जाईल.

**हिंदू धर्मात गणेशाला बुद्धीची, ज्ञानाची देवता मानतात. सर्व शुभ कार्यात प्रथम गणपतीची पूजा करतात. कारण तो सुखकर्ता, दुःखहर्ता, विघ्नहर्ता आहे. या गणेश चतुर्थीचा इतिहास, आपण गणेश चतुर्थी का साजरी करतो? याचे महत्त्व, त्याचप्रमाणे गणेश चतुर्थी कशाप्रकारे साजरी केली जाते? याबाबतची सगळी माहिती महाईन्यूजच्या माध्यमातून आपल्यापर्यंत घेऊन आलो आहोत.**

## गणेश चतुर्थीचा इतिहास

» स्कंदपुराण, नारद पुराण, त्याचप्रमाणे याज्ञवल्क्य स्मृती, महाभारत यांसारख्या ग्रंथांमध्ये गणपतीचा उल्लेख आढळून येतो. पाचव्या आणि आठव्या शतकामध्ये एलोरा लेण्यांसारख्या हिंदू, बौद्ध, जैन मंदिरांमध्ये केलेल्या कोरीव कामांमध्ये गणेशाच्या मूर्ती विराजमान असल्याचे दिसून येते. गणेश चतुर्थीचा उगम हा प्राचीन काळापासून आहे. परंतु सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात या गणेश चतुर्थीला महत्त्व प्राप्त झाले.

## चतुर्थीला चंद्र का बघू नये ?

» गणेश चतुर्थीच्या दिवशी रात्री चंद्र दर्शन करू नये. यासाठी फार पूर्वीपासून एक कथा सांगितली जाते. एके दिवशी आपले लाडके बाप्पा श्री गणेश मूषकावर बसून मोठ्या लगबगिने कुठेतरी जात होते. तेव्हा त्या गडबडीत असताना ते घसरले आणि पडले. त्यांना पडलेले पाहून चंद्र जोरात हसू लागला. त्यामुळे गणपती बाप्पाला राग आला. आणि त्याने चंद्राला शाप दिला. बाप्पा म्हणाला, आजपासून तुझं तोंड कोणीही पाहणार नाही. जो तुझे तोंड पाहिलं, त्याच्यावर चोरीचा खोटा आळ येईल. गणपती बाप्पाच्या या बोलण्यामुळे चंद्र मात्र चांगलाच घाबरला आणि गणपती बाप्पाला प्रसन्न करून घेण्यासाठी त्यांनी मोठमोठे तप सुरू केले.

## हरतालिका पूजा व्रतकथा

» चंद्राच्या या भक्तीने गणपती बाप्पा देखील प्रसन्न झाले. आणि त्यांनी चंद्राला उःशाप दिला की, फक्त गणेश चतुर्थीच्या दिवशी तुझा तोंड कोणीही पाहणार नाही. त्यानंतर चंद्राने गणपती बाप्पाकडे विनंती केली की, जर एखाद्याने चुकून त्या दिवशी माझे दर्शन घेतले तर त्यांनी काय करावे माझ्या चुकीची शिक्षा एखाद्या निष्पाप व्यक्तीला व्हायला नको. यावर बाप्पाने सांगितले की, संकष्टी चतुर्थी व्रत केल्यास त्या व्यक्तीची खोट्या आळातून मुक्तता होईल. म्हणून या दिवशी कोणीही चंद्र दर्शन करत नाही.

## गणेश चतुर्थी का महत्वाची आहे ?

» हिंदू कॅलेंडरमधील एक महत्त्वाचा सण म्हणून गणेश चतुर्थीला पाहिले जाते. हा उत्सव संपूर्ण भारतभर मोठ्या उत्साहाने भक्तीने आनंदाने साजरा केला जातो. या सणाला अनेक कारणांमुळे महत्त्व प्राप्त होते. हा सण भारतीय संस्कृती, वारसा आणि विविधतेचा उत्सव आहे. त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या, पर्यावरणाच्यादृष्टीने आणि मुख्यतः आर्थिकदृष्टीने हा सण महत्त्वाचा समजला जातो.



1 गणेश चतुर्थी ही काही ठिकाणी दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस, दहा दिवस अशाप्रकारे साजरी केली जाते. संपूर्ण भारतामध्ये, त्याचप्रमाणे परदेशातही ज्या ठिकाणी भारतीय राहतात त्याठिकाणी मोठ्या आवडीने हा सण साजरा केला जातो. सामाजिक एकोपा राहण्यासाठी लोकमान्य टिळकांनी गणेश चतुर्थीच्या दिवशी सर्व घरांमध्ये आणि त्याचप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी श्री गणेशाच्या मूर्तीची स्थापना केली. हा गणेशोत्सव भाद्रपद महिन्यामध्ये दरवर्षी साजरा केला जातो. त्यासाठी मोठ्या मोठ्या शहरांमध्ये ठिकठिकाणी गणेश मंडळांची स्थापना केली जाते. सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये देखील दररोज सकाळी आणि संध्याकाळी गणेशाची पूजा आणि आरती केली जाते. तसेच नैवेद्य दाखवून प्रसादाचे देखील वाटप करण्यात येते. या उत्सव प्रसंगी अनेक गणेश मंडळामध्ये विविध प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात. तसेच या सार्वजनिक गणेशोत्सवाचे देखावे पाहण्यासाठी लोकांची गर्दी जमलेली पहावयास मिळते. या निमित्ताने समाजातील लोक एकत्र येतात आणि आपल्यातील मतभेद दूर करून हा सण उत्साहाने आणि आनंदाने साजरा करतात.

2 आपला भारत देश हा संस्कृती धार्मिक परंपरा जपणारा देश आहे. या देशांमध्ये साजरे होणारे प्रत्येक सण, उत्सव मोठ्या उत्साहाने आनंदाने आणि एकत्र येऊन साजरे केले जातात. गणेश चतुर्थी हा भारतातील एक महत्त्वाचा असा सण आहे, जो विविधता आणि सांस्कृतिक वारसाचे प्रतिनिधित्व करतो. संपूर्ण देशभरात विशेष करून महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये हा सण मोठ्या उत्साहात, आनंदात साजरा केला जातो. या उत्सवामुळे लोकांना एकत्र येण्यासाठी, त्याचप्रमाणे परंपरा साजरी करण्यासाठी, तसेच सांस्कृतिक पद्धत अवलंबण्यासाठी एक व्यासपीठ मिळते.

3 या उत्सवाच्या शेवटच्या दिवशी श्री गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन पाण्यामध्ये करण्यात येते. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये पाण्यामध्ये न विरघळणाऱ्या पदार्थांचा वापर करून गणपतीच्या मूर्ती केल्या जातात. यामुळे पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम घडून येत आहे. याला आळा घालण्यासाठी, पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन तसेच पर्यावरण पूरक उत्सवांना चालना देण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे नैसर्गिक साहित्यापासून म्हणजेच माती, कागद यापासून बनवलेल्या गणेशाच्या मूर्ती उदयास येत आहे. यामुळे या मूर्तींचे पाण्यामध्ये विघटन होऊन पर्यावरणातील कुठल्याही जीवांना हानी होत नाही.

4 गणेशोत्सवाला ज्याप्रमाणे संस्कृती, सामाजिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्व आहे, त्याचप्रमाणे आर्थिक दृष्ट्या सुद्धा महत्त्व आहे. हा सण साजरा करण्यासाठी सणाला लागणाऱ्या सजावटीच्या, मिठाईच्या तसेच खाण्याच्या वस्तू खरेदी करण्यासाठी लोक बाजारपेठेमध्ये येत असतात. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. येथील कारागीर, सजावटकार, व्यापारी लोकांना यामुळे रोजगार निर्माण होतो. पुराण कथेनुसार माता-पार्वतीचा पुत्र भगवान गणेश याचा जन्म भाद्रपद चतुर्थीला झाला होता. म्हणून आपण गणेश चतुर्थी हा सण साजरा करतो. भगवान शंकर आणि पार्वती पुत्र गणपती बुद्धीची देवता आहे. हिंदू धर्मात भगवान श्री गणेशाला प्रथम पूजेचा मान

# वेलकम बाप्पा!

पार्वती देवीला स्नानासाठी जावयाचे होते. पण आसपास लक्ष ठेवण्याकरता कोणीच नव्हते. तेव्हा पार्वती देवीने आपल्या अंगावरील मळाने एक मूर्ती बनवली आणि ती जिवंत केली. या मूर्तीला पहारेकरी नेमलं आणि सांगितलं की, कोणालाही आतमध्ये येऊ देऊ नकोस. असे सांगून पार्वतीमाता स्नानासाठी आत गेली. भगवान शंकर काही वेळाने तिथे आले आणि ते आत जाऊ लागले. तोच त्या पहारेकऱ्याने त्यांना अडवले. त्यावर भगवान शंकर संतप्त झाले आणि त्यांनी त्या पहारेकऱ्याचं शिर धडावेगळं केलं. पार्वतीदेवी जेव्हा स्नान करून बाहेर आली तेव्हा त्यांनी हा प्रकार पाहिला आणि त्या संतापल्या. ते धडावेगळं शिर पाहून तिने पूर्ण ब्रम्हांड हादरवून सोडलं. सर्व देव अगदी ब्रम्हदेवापासून सगळे देव पार्वतीची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. पण पार्वती कोणाचं काहीही ऐकून घेत नाही. तेव्हा शंकर देव आपल्या गणाला आदेश देतात की, पृथ्वीतलावर जाऊन सर्वात आधी जो प्राणी दिसेल त्याचं शिर कापून घेऊन ये. गण बाहेर पडल्यावर सर्वात आधी त्याला हत्ती दिसला. तो त्याचं शिर घेऊन आला. भगवान शंकरांनी ते शिर पुतळ्याला लावले आणि त्या मूर्तीला जिवंत केले. हा पार्वतीचा मानस पुत्र गज (हत्ती) आनन (मुख) म्हणजेच गजानन होय. शंकर देवाने त्याला गणाचा ईश म्हणेज देव म्हणून गणेश नाव ठेवलं. हा दिवस चतुर्थीचा होता. त्यामुळे चतुर्थीला गणेश चतुर्थी म्हणून महत्त्व आहे. त्यामुळे तुम्हाला गणेश चतुर्थी ची माहिती

# मिशन वर्ल्ड कपसाठी टीम इंडिया सज्ज!

## » टीम इंडियाचे टॉप ऑर्डरचे फलंदाज फॉर्ममध्ये परतले

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**टीम इंडिया मिशन वनडे वर्ल्ड कपसाठी सज्ज आहे. आशिया चषक जिंकून भारताने क्रिकेटच्या सर्वात मोठ्या स्पर्धेसाठी आपले इरादे स्पष्ट केले आहेत. या स्पर्धेत, व्यवस्थापनाला त्या प्रश्नांची उत्तरे सापडली जी दीर्घकाळ संघाला सतावत होती. टॉप ऑर्डर फॉर्ममध्ये आहे, केएल राहुल, इशान किशनसह श्रेयस अय्यर देखील नंबर-4 आणि मधल्या फळीत तयार आहेत. पॉवरप्लेसह गोलंदाज मधल्या षटकांमध्येही विकेट घेत आहेत. या संघाने बाद फेरीत अडखळण्याचा सिलसिलाही मोडला आहे.**



आशिया चषकापूर्वी जसप्रित बुमराह दुखापतीनंतर स्वत:ला सिद्ध करू शकेल का, हा मोठा प्रश्न होता. मोहम्मद सिराज एकटा तर पडणार नाही आणि मोहम्मद शमीच्या जागी शार्दुल ठाकूरला प्लेइंग-11 मध्ये संधी देणे योग्य ठरेल का? असे प्रश्न होते. दुखापतीनंतर बुमराहने शानदार पुनरागमन केले. सुपर-4 टप्प्यात पाकिस्तानविरुद्ध वनडेमध्ये प्रथमच गोलंदाजी केली. संघाला शानदार सुरुवात करून देत त्याने एक विकेटही घेतली. त्यानंतर त्याने श्रीलंकेविरुद्धच्या सुपर-4 आणि अंतिम दोन्ही सामन्यांमध्ये भारताची पहिली विकेट मिळवली.सिराजने बुमराहला चांगली साथ दिली. त्याच्या 6 विकेट्सने फायनलमध्ये श्रीलंकेचा धुव्वा उडवला. त्याने विरोधी संघाच्या फलंदाजांवर दबाव आणून त्यांना धावा करण्यापासून रोखले. सिराजने या स्पर्धेत भारताकडून सर्वाधिक 10 विकेट घेतल्या.संघाने तिसरा वेगवान गोलंदाज म्हणून शार्दुलचा वापर केला. त्याने पाकिस्तान आणि नेपाळविरुद्ध प्रत्येकी एक विकेट घेतली. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात त्याने 3 महत्त्वपूर्ण विकेट घेतल्या, त्याने प्रत्येक वेळी कठीण परिस्थितीत विकेट घेतल्या. टीम इंडिया पहिल्या 10 षटकांत विकेट्स घेऊन दबाव निर्माण करत होती, पण मधल्या षटकांमध्ये गोलंदाज खूप धावा देत होते.

आशिया चषक स्पर्धेत हार्दिक पांड्यासह कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजा यांच्या गोलंदाजीमुळे ही समस्याही दूर झाली. कुलदीपने आशिया चषकातील 4 सामन्यात गोलंदाजी केली. नेपाळविरुद्ध त्याला एकही विकेट मिळाली नाही आणि अंतिम फेरीत तो एकच षटक टाकू शकला. पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्धच्या उर्वरित 2 सामन्यात त्याने 5 आणि 4 बळी घेतले. मधल्या षटकांमध्ये तो पुन्हा एकदा संघाचे ट्रम्प कार्ड म्हणून उदयास आला.

जडेजाने बहुतांशी फिरकी खेळपट्ट्यांचा फायदा घेतला. नेपाळविरुद्ध त्याने 40 धावांत 3 बळी घेतले. श्रीलंकेविरुद्धच्या महत्त्वाच्या सुपर-4 सामन्यात त्याने 10 षटकात केवळ 33 धावा दिल्या आणि 2 मोठे बळीही घेतले. हार्दिकने अंतिम सामन्यात केवळ 3 धावा देत 3 विकेट घेतल्या. सुपर-4 टप्प्यातही त्याने पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध दमदार गोलंदाजी केली होती. हार्दिकने अतिशय किफायतशीर गोलंदाजी केली, त्यामुळे विरोधी संघावर दबाव वाढत गेला.

### मधल्या फळीतील फलंदाजीची समस्या

» युवराज सिंगच्या निवृत्तीनंतर टीम इंडियाला वनडेमध्ये चौथ्या क्रमांकावर एकही फलंदाज सापडला नव्हता. 2019 च्या विश्वचषकानंतर श्रेयसने ही समस्या सोडवली, पण दुखापतीमुळे तो बहुतेक सामने खेळू शकला नाही. दुखापतीतून पुनरागमन करणाऱ्या केएल राहुलचा फॉर्महीही चिंतेचा विषय होता राहुलने पहिले दोन सामने खेळले नाहीत, पण पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात शतक झळकावून त्याचा फिटनेस आणि फॉर्म दोन्ही सिद्ध केले. त्याने सर्व 4 सामन्यांमध्ये विकेट्स राखल्या, अनेक शानदार झेल घेतले आणि कर्णधार रोहितला अनेक वेळा रिव्ह्यू घेण्यात मदत केली.

# मोहम्मद सिराजचा प्रेरणादायी प्रवास!

## » वडील रिक्षा चालवायचे; वैयक्तिक आयुष्य अडचणींनी भरलेले

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया कप 2023 च्या अंतिम सामन्यात मोहम्मद सिराजने आपल्या तुफानी गोलंदाजीने श्रीलंकेचे कंबरडे मोडले. सिराजच्या एकामागून एक स्विंग होणाऱ्या चेंडूंनी श्रीलंकेच्या फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये जाण्यास भाग पाडले. अंतिम सामन्यात सिराजने त्याचे पहिले षटक मेडन टाकला. त्या षटकात कुसल परेरा पूर्णपणे अडचणीत दिसला. या मेडन ओव्हरनेच सिराजसाठी टोन सेट केला. यानंतर सिराजने आपल्या पुढच्याच षटकात पाथुम निसांका, सदिरा समरविक्रमा, चारिथ असालंका आणि धनंजय डी सिल्वा यांना बाद केले.**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतीय गोलंदाजाने एकाच षटकात चार विकेट घेण्याची ही पहिलीच वेळ होती. चार विकेट घेतल्यानंतरही सिराज थांबला नाही. त्याने विरोधी संघाचा कर्णधार दासून शनाका आणि कुसल मेंडिस यांनाही माघारी धाडले. 29 वर्षीय मोहम्मद सिराजचा क्रिकेट प्रवास अडचणींनी भरलेला आहे आणि त्याचा टीम इंडियात येण्याचा प्रवास सोपा नव्हता. सिराज अत्यंत सामान्य कुटुंबातील आहे. सिराजचा जन्म 1994 साली हैदराबादच्या फर्स्ट लान्सर भागात भाड्याच्या घरात झाला. सिराजचे वडील मोहम्मद घौस ऑटोरिक्षा चालवतात, तर आई गृहिणी होती. सिराजचा मोठा भाऊ इस्माईल त्याच्या वडिलांना मदत करायचा. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सिराजने क्रिकेटचे प्रशिक्षण कधीच औपचारिकपणे घेतले नाही. त्याच्या खेळण्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या दिवसांत तो स्थानिक ईदगाह मैदानावर अनवाणी



कॅनव्हास बॉलने गोलंदाजी करत असे. 2015 मध्ये त्याने क्रिकेट बॉलने गोलंदाजी सुरू केली. विशेष म्हणजे सिराजला आधी फलंदाज व्हायचं होतं. मात्र, नंतर त्याने गोलंदाजीत चांगली कामगिरी करण्यास सुरुवात केली. स्थानिक स्पर्धांमध्ये खेळून त्याने आपल्या प्रतिभेला वाव दिला. सिराजच्या मेहनतीचे फळ मिळाले आणि त्याने 2015-16 रणजी हंगामात हैदराबादसाठी प्रथम श्रेणीतून पदार्पण केले. सिराजने त्याच्या दुसऱ्या रणजी मोसमात हैदराबादसाठी 9 सामन्यात 41 विकेट घेतल्या. या चमकदार कामगिरीमुळे त्याची इराणी ट्रॉफीसाठी उर्वरित भारतीय संघात निवड झाली. जुलै 2017 मध्ये, दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारत अ संघातही त्याची निवड झाली. दमदार कामगिरी पाहून रॉयल चॅलेंजर्स बंगलोरने सिराजला आयपीएल 2017 पूर्वी 2.6 कोटींना स्वतःसोबत घेतले. सिराजने त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात राजकोटमध्ये न्यूझीलंडविरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. T20 मध्ये पदार्पण केल्यानंतर सिराजने आपल्या कुटुंबासाठी घर खरेदी केले. त्याचे वडील कधीही ऑटोरिक्षा चालवणार नाहीत याचीही त्याने खात्री केली. त्यानंतर सिराजने जानेवारी 2019 मध्ये अॅडलेडमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात मोहम्मद सिराजने वडील गमावले होते. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सिराजला मायदेशी परतण्याचा पर्याय दिला होता, परंतु त्याने भारतीय संघासोबत राहणे पसंत केले. सिराज म्हणाला होता, 'माझ्या वडिलांनी मला सर्वात जास्त साथ दिली.

### एका डावात 5 विकेट घेणारा सिराज

» आपल्या मुलाने कसोटी क्रिकेट खेळावे, असे सिराजच्या वडिलांचे स्वप्न होते. मोहम्मद घौस यांचा विश्वास होता की खरे क्रिकेट हे कसोटी सामना आहे. सिराजने 2018 मध्ये आपल्या दिवंगत वडिलांचे स्वप्न पूर्ण केले, जेव्हा तो 26 डिसेंबर 2020 रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध मेलबर्न कसोटी सामन्यात दिसला. त्या पदार्पणाच्या कसोटी सामन्यात सिराजने एकूण पाच विकेट घेत सर्वांना प्रभावित केले. सिराजने गाबा कसोटी सामन्यात दुसऱ्या डावात पाच बळी घेत ऑस्ट्रेलियाच्या ऐतिहासिक मालिका विजयात पुन्हा महत्त्वाची भूमिका बजावली. गाबा येथे एका डावात 5 विकेट घेणारा सिराज हा केवळ 5वा भारतीय गोलंदाज ठरला.